आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१७ मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला
- मुंबईत शिवाजी पार्कवर महायुतीची, तर वांद्रे-कुर्ला संकुलात इंडीया आघाडीची प्रचार सभा / मोदींशिवाय या देशाचं नेतृत्त्व करण्याची क्षमता कोणामध्येही नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गौरवोद्गार
- धर्माच्या आधारे लाभ देण्याचं काँग्रेसचं धोरण बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या विरोधातलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं उत्तर प्रदेशातल्या प्रचारसभेत प्रतिपादन

  **आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला पोचला आहे. पाचव्या टप्प्यासाठी येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या १३ मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघांमधे प्रचार उद्या संपत असून, सर्वच राजकीय पक्षांचे नेते सभा, बैठका, पदयात्रा काढून जोरदार प्रचार करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत शिवाजी पार्क इथं मुंबईतल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित प्रचार सभेला संबोधित करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांच्यासह मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि इतर ज्येष्ठ नेते या सभेला उपस्थित आहेत.

मोदींशिवाय या देशाचं नेतृत्त्व करण्याची क्षमता कोणामध्येही नसल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दादरमधल्या शिवाजी पार्कवर

प्रचारसभेत केलं. बाळासाहेबांनीही नरेंद्र मोदी यांना पाठिंबा दिला होता. आताही मोदींचं काम आणि अयोध्येतला राम आपल्या पाठिशी आहे, असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

या सभेत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महापालिकेतल्या घोटाळ्यांवरुन उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. महाराष्ट्रातले उद्योग गुजरातमध्ये गेल्याचा आरोप खोटा आहे. मी मुख्यमंत्री होतो तेव्हा सर्वाधिक उद्योग महाराष्ट्रात आले होते असा दावा त्यांनी यावेळी केला.

विरोधकांकडे विकासाचा मुद्दा नसल्याचा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी केला.

इंडिया आघाडी सत्तेवर येणार नसल्यानं त्यांच्याविषयी बोलून वेळ घालवणार नसल्याचं मनसे प्रमुख राज ठाकरे या सभेत म्हणाले. मोदींमुळेच अयोध्येत राम मंदिर झालं अन्यथा ते झालं नसतं. मोदी यांनी काश्मिरमधून ३७० कलम हटवून दाखवलं असं त्यांनी सांगितलं. मोदी यांनी काश्मिरमधून ३७० कलम हटवून दाखवलं, ट्रिपल तलाक बंद केला असं त्यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, शालेय अभ्यासक्रमात लहानपणापासून मराठा साम्राज्याचा इतिहास यावा आणि शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांना ऐतिहासिक वैभव प्राप्त करुन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय समिती नेमण्याची मागणी त्यांनी केली. मुंबई-गोवा महामार्ग लवकर पूर्ण करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे यांच्यासह अनेक मान्यवर या सभेला उपस्थित आहेत.

मुंबईत वांद्रे-कुर्ला परिसरात इंडीया आघाडीची प्रचारसभा होत आहे. राहुल गांधी, शरद पवार, आणि उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांच्यापुढं आव्हान उभं केलं आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत, या सभेत म्हणाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विजय वडेट्टीवार, नसीम खान या

नेत्यांचीही भाषणं यावेळी झाली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि आघाडीचे इतर नेते या सभेला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात विविध राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग येत आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज अल्पसंख्याकांच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा काँग्रेसला लक्ष्य केलं. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माधारित लाभ वाटपाला खुला विरोध केला होता आणि धर्माच्या आधारे लाभ देण्याचं काँग्रेसचं धोरण बाबासाहेबांच्या विचारांच्या विरोधातलं आहे, असं ते हमीरपूर जिल्ह्यात प्रचारसभेला संबोधित करताना म्हणाले. तत्पूर्वी बाराबंकी इथल्या सभेतही मोदी यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडलं. समाजवादी पक्षाने आता बंगालमध्ये आश्रय घेतला आहे आणि त्यांची राजकीय युती फक्त मतांचं राजकारण आणि तुष्टीकरणासाठी आहे, असं ते म्हणाले. फतेहपूर इथंही एका सभेला मोदी यांनी संबोधित केलं. यापूर्वी उत्तर प्रदेशातलं सरकार गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारासाठी कुप्रसिद्ध होतं, पण आता राज्य विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

दरम्यान, रायबरेलीतल्या ऊँचाहार विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज पांडे यांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. त्यानंतर अमित शहा यांनी ऊँचाहार इथं प्रचारसभा घेतली. इंडी आघाडीला सत्ता मिळाली तर ते पुन्हा राम मंदिराला कुलूप घालतील, असं शहा म्हणाले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची प्रचारसभा बलिया जिल्ह्यात झाली. भाजपा सलग तिसऱ्यांदा सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी आज रायबरेलीमधे प्रचारसभा घेतली. राहुल गांधी यांनी २० वर्ष रायबरेली इथल्या

जनतेची सेवा केली आहे, असं सांगत त्यांना मतदान करण्याचं आवाहन सोनिया गांधी यांनी केलं. तर देशातली जनता भाजपाला कंटाळली असून, आता त्यांना बदल हवा आहे, असं प्रियंका गांधी म्हणाल्या.

काँग्रेसचे अमेठीचे उमेदवार किशोरी लाल शर्मा यांच्या प्रचारात आज काँग्रेस नेते राहुल गांधी, आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव सहभागी झाले. इंडीया आघाडी सत्तेत आली तर शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी किमान आधारभूत किंमतीचा कायदा आणला जाईल, असं आश्वासन अखिलेश यादव यांनी दिलं.

बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनीही आज प्रतापगढ इथं प्रचारसभा घेतली आणि भाजपा आणि काँग्रेसवर टीका केली.

**<><><><><>**

गेल्या ६० वर्षात काँग्रेसच्या कारकिर्दीत झाली नाहीत एवढी कामं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात पूर्ण झाली आहेेत. यात रस्ते, सिंचन या योजनांसह मुलभुत सोयी सुविधांच्या कामांचा समावेश आहे, असं मत भाजपा नेते नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. ते आज धुळे जिल्ह्यातल्या शिंदखेडा इथं महायुतीचे उमेदवार डॉ सुभाष भामरे यांच्यानिवडणूक प्रचार सभेत बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंंद्रशेखर बावनकुळे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

दिल्लीतलं प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांत कोणत्याही ठोस उपाय योजना राबवल्या नसल्याचा आरोप आज काँग्रेसनं केला. काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी दिल्लीतील काँग्रेस कार्यालयात पत्रकार परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते.

दिल्लीत मोठ्या प्रमाणावर प्रदूषण असल्यानं निवडणुकीत हा महत्त्वाचा मुद्दा आहे. शहराला प्रदूषण मुक्त करणं ही केंद्र सरकारची जबाबदारी असल्यानं ती पूर्ण

करण्यासाठी त्यांनी काम करणं गरजेचं असल्याचं जयराम यांनी सांगितलं. प्रदूषण कमी करण्यासाठी रासायनिक प्रदूषण, अरावली क्षेत्रात केली जाणारी वृक्षतोड, दिल्लीच्या आसपास असलेल्या वीट भट्ट्यांमुळे होणारं प्रदूषण तसंच यमुना नदीतील प्रदूषणाकडेही लक्ष वेधलं.आगामी लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल असा विश्वास ही जयराम रमेश यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी प्रकारात भारताच्या सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं आज उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य-पूर्व फेरीत मलेशियाच्या जुनैदी अरिफ आणि रॉय किंग याप जोडीचा त्यांनी पराभव केला.

त्यापूर्वी अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो यांनी दक्षिण कोरियाच्या ली यू लिम आणि शिन सेयुंग चॅन यांच्याविरुद्धच्या अटीतटीच्या लढतीनंतर महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**<><><><>**

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, अर्थात इफ्फीच्या अधिकृत पोस्टरचं अनावरण माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी फ्रान्समध्ये ७७व्या कान चित्रपट महोत्सवात केलं. चित्रपट निर्माते अशोक अमृतराज, रिची मेहता, पार्श्वगायक शान, अभिनेता राजपाल यादव, ज्येष्ठ चित्रकर्मी बॉबी बेदी यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते. इफ्फी नोव्हेंबर महिन्यात गोवा इथं होणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच कान चित्रपट महोत्सवात भारत पर्वाचं यजमानपद भारत भूषवत आहे.

**<><><><>**

आगामी काळात जगाचं नेतृत्व करण्याच्या दृष्टीने भारत, सर्व प्रकारच्या राष्ट्रीय क्षमता विकसित करत असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं

आहे. ते आज नवी दिल्ली इथं व्यापारी संघटनेनं आयोजित केलेल्या परिषदेला संबोधित करताना बोलत होते. व्यवसायासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याबरोबरच भारतानं क्षमता विकास आणि स्पर्धात्मकता वाढवण्याचा प्रयत्न करायला हवा, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नायगाव - जूचंद्र असा नवा बायपास तयार करून बोरीवली, कोकण रेल्वे मार्गाला जोडण्याच्या कामाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार मंजुरी दिल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. ते आज कांदिवली इथं कोकणवासियांच्या मेळाव्यात बोलत होते. हार्बर मार्ग बोरिवलीला जोडण्याच्या आणि वंदे भारत मेट्रो ट्रेन सुरू करण्याच्या कामांनाही मंजुरी दिल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईत शिवाजी पार्कवर सुरू असलेल्या प्रचारसभेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या संबोधित करत आहेत. देशाला विकसित करण्यासाठी २०४७ चं स्वप्न घेऊन या शहरात आल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. भारतासोबत स्वतंत्र झालेले कित्येक देश भारताच्या पुढे निघून गेले, पण त्या काळच्या सरकारांनी भारतीयांच्या सामर्थ्यांवर विश्वास ठेवला नाही. त्यामुळं भारताचा विकास रखडल्याचा आरोप त्यांनी केला. सभेला येण्यापूर्वी त्यांनी चैत्यभूमीवर जाऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि सावरकर स्मारकावर जाऊन स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन केलं.

**//<><><><><>//**